**जिल्हा खनिकर्म अधिकारी, खनिकर्म विभाग, अकोला यांचेकडून प्राप्त झालेल्या अकोला जिल्हयातील २३ रेतीघाटांच्या प्रस्तावाबाबत दि. १५.०९.२०२५ रोजी नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला येथे दुपारी ३.०० वाजता घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचे इतिवृत्त**

----------------

जिल्हा खनिकर्म अधिकारी खनिकर्म विभाग जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला यांचेकडून अकोला जिल्हयातील २३ रेतीघाटांचे प्रस्ताव, पर्यावरणीय अनुमती प्राप्त करण्याकरीता पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेण्याबाबत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळास प्राप्त झाले. केंद्रीय वने व पर्यावरण मंत्रालय (केंद्रीय पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय) यांचे दि. १४.०९.२००६ च्या अधिसुचनेतील तरतुदीनुसार सदर लोकसुनावणी आयोजीत करण्यात आली होती. त्या अनुषंगाने सदर जाहिर लोकसुनावणी दि. १५.०९.२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला येथे घेण्यात आली. सदर जाहिर लोकसुनावणीकरीता मा. सदस्य सचिव म.प्र.नि. मंडळ मुंबई यांनी आदेश क्र. E-65 of 2025 पत्र क्र. BO/JD(WPC)/PH/B-250910-FTS-0210 दि. १०.०९.२०२५ अन्वये लोकसुनावणी समीती गठन आदेश पारीत केलेला होता.

सदर जाहिर लोकसुनावणीस खालीलप्रमाणे जाहिर लोकसुनावणी समितीचे सदस्य उपस्थित होते.

१. मा. श्रीमती वर्षा मीना, जिल्हादंडाधिकारी, अकोला — अध्यक्ष
२. श्री. संजय दे. पाटील, प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि. मंडळ, अमरावती — सदस्य
३. श्री महेश दे. भिवापुरकर, उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, अकोला — संयोजक

सदर जाहिर लोकसुनावणी बाबतची सुचना दैनिक लोकमत (मराठी) व दैनिक हितवाद (इंग्रजी) या वृत्तपत्रामध्ये दि. १४.०८.२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. त्या अनुषंगाने सदर जाहिर लोकसुनावणी दि. १५.०९.२०२५ रोजी घेण्यात आली.

मा. अध्यक्ष पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी तथा जिल्हाधिकारी मा. श्रीमती वर्षा मीना यांचे परवानगीने लोकसुनावणी सुरू करण्यात आली. सर्वप्रथम श्री. महेश दे. भिवापुरकर, उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ अकोला यांनी सर्व उपस्थितीतांचे स्वागत करून प्रास्ताविक केले.

अकोला जिल्हयातील २३ रेतीघाटांबाबत जिल्हा खनिकर्म अधिकारी अकोला यांनी सादर केलेले पर्यावरण व्यवस्थापन आराखडा (ईएमपी), कार्यकारी सारांश (इंग्रजी व मराठी) परीसरातील नागरीकांना/गावक-यांना/संबंधीत पर्यावरण क्षेत्रात काम करणा-या संस्थाना अवलोकनार्थ खालील ठिकाणी ठेवण्यात आलेले होते.

१. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईट, २ रा व ४ था माळा, सिनेप्लानेट सिनेमा समोर, सायन सर्कल जवळ (पु)मुंबई- ४०००२२.
२. प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, सहकार सुरभी बापटवाडी, विवेकानंद कॉलनी जवळ, अमरावती - ४४४६०४
३. उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,अळशी प्लॉट, हुतात्मा स्मारकाच्या समोर,नेहरू पार्क चौक, अकोला- ४४४००१
४. जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला, जिल्हा परिषद, अकोला, जिल्हा उदयोग केंद्र, अकोला,
५. अकोला जिल्हयातील सर्व उप-विभागीय कार्यालये, सर्व तहसिल कार्यालये व ग्रामपंचायत कार्यालय, ग्राम पंचायत लाखपुरी, विरवाडा, दापुरा, कोळसरा, खापरवाडा, खापरवाडा खैरी, घुंगशी हसनापुर, दुर्गवाडा, लोणसरा, सांगवामेळ, सांगवी, बपोरी, पिंगळा ता. मुर्तिजापुर ग्रामपंचायत काजीखेड, हिंगणा शिकारी, मोखा, स्वरुपखेड, जानोरी मेळ, हाता ता. बाळापुर, ग्रामपंचायत तळेगांव पार्तुडा, वांगरगाव बाभुळगांव ता. तेल्हारा जि. अकोला.

श्री. म.दे. भिवापुरकर, उप-प्रादेशिक अधिकारी अकोला आणि संयोजक पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी यांनी प्रकल्प समन्वयक यांना रेतीघाट प्रकल्पाबाबत सादरीकरण करण्याची विनंती केली. त्यानंतर प्रकल्प समन्वयक यांचे वतीने प्रतिनिधी डॉ. आशिष शुक्ला, एन्हायरो टेक्नो कंसल्ट प्रा.लि., नागपूर यांनी रेतीघाट प्रकल्पाबाबत सादरीकरण दिले.

श्री. म.दे. भिवापुरकर, उप-प्रादेशिक अधिकारी, अकोला यांनी सांगीतले की, सदर रेती घाटांच्या प्रकल्पाबाबत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळास लेखी स्वरूपात सुचना/आक्षेप प्राप्त झालेले नाही. त्यांनी सदर प्रस्तावाबाबत उपस्थितांच्या काही सुचना/आक्षेप असल्यास त्याप्रमाणे मांडावेत अशी विनंती उपस्थितांना केली.

श्री विजय तायडे, मलकापूर अकोला, जि. अकोला यांनी सुचना केली की, सदर लिलावाची प्रक्रिया ही घाटनुसार करण्यात आली तर सोयीचे होईल. यावर प्रतिनिधी डॉ. आशिष शुक्ला, एन्हायरो टेक्नो कंसल्ट प्रा.लि., नागपूर यांनी सांगीतले की, दि. ८ एप्रिल २०२५ च्या शासनाच्या धोरणानुसार सर्व घाटांचा लिलाव हा उपविभागीय अधिकारी यांच्या स्तरावर करावयाचे आहेत. त्यानुसार एका उपविभागात जेवढे रेतीघाट असतील ते सर्व रेतीघाटांचा लिलाव एकाच वेळी करण्यात येईल.

श्री तायडे यांनी विचारणा केली की, मागील वर्षी ज्या रेतीघाटांचा लिलाव पर्यावरणीय अनुमती नसल्यामुळे करण्यात आलेला नाही त्याची सध्यास्थिती काय आहे. याबाबत जिल्हा खनिकर्म अधिकारी, अकोला यांनी सदर रेतीघाटांची पर्यावरणीय अनुमती प्राप्त झाल्यानंतर लगेच लिलाव प्रक्रिया सुरू करण्यात येईल असे सांगीतले.

श्री व्ही. सुनन्दा रेड्डी यांनी सदर रेती घाट प्रक्रियेस पाठींबा देत असल्याचे सांगीतले तसेच प्रकल्प प्रवर्तकांनी सीएसआर फंडाचा वापर योग्य रीतीने करावा असे सुदधा सुचविले. त्यांनी पूढे सांगीतले की, रेती घाटाच्या परीसरात फळझाडांची लागवड करावी. यावर प्रतिनिधी डॉ. आशिष शुक्ला, एन्हायरो टेक्नो कंसल्ट प्रा.लि., नागपूर यांनी सांगीतले की, सीएसआर फंड हा सीईआर असुन त्याचा वापर योग्य रीतीने करण्यात येईल. तसेच रेतीघाटांच्या परीसरात फळझाडांची लागवड करण्यात येईल.

मा. अध्यक्षांचे परवानगीने उपस्थितांचे आभार मानुन सदर जाहीर लोकसुनावणी संपन्न झाल्याचे जाहीर करण्यात आले.

| | | |
|---|---|---|
| (महेश भिवापुरकर) | ( सं. दे. पाटील ) | (वर्षा मीना) |
| आयोजक | सदस्य | अध्यक्ष लोकसुनावणी समिती |
| तथा | तथा | तथा |
| उप प्रादेशिक अधिकारी | प्रादेशिक अधिकारी | जिल्हादंडाधिकारी, अकोला |
| अकोला | अमरावती | |